सिडको/कार्मिक/आस्था/२०१९/ २२ दि. ०९/०५/२०१९

# परिपत्रक

**विषय : ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वचनपत्र सादर करणेबाबत.**

संदर्भ : क्र. सिडको/कार्मिक/२०१९ दि. ०८/०४/२०१९

महाराष्ट्र शासन राजपत्र, वित्त विभाग अधिसूचना क्र. वेपूर/२०१९/प्र.क्र. १/सेवा-९ दि. ३०/०१/२०१९ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांकरीता ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. शासनाने लागू केलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर सिडको महामंडळ ठराव क्र. क्र. १२१५४ दि. १८/०२/२०१९ अन्वये सिडको अधिकारी / कर्मचाऱ्यांस ७ व्या वेतन आयोग दि. ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र, वित्त विभाग अधिसूचना क्र. वेपूर/२०१९/प्र.क्र. १/सेवा-९ दि. ३०/०१/२०१९ मधील नियम ६ नुसार द्यावयाचे वचनपत्र सोबत जोडलेल्या जोडपत्र - ४ मधील नमुन्यात लेखी द्यावा लागेल. याबाबत कार्यालयीन परिपत्रक क्र. सिडको/कार्मिक/२०१९ दि. ०८/०४/२०१९ अन्वये सदर वचनपत्र दि. २३/०४/२०१९ पर्यंत कार्मिक विभागास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि काही अधिकारी / कर्मचारी यांनी सदर वचनपत्र (जोडपत्र - ४) अद्यापपर्यंत कार्मिक विभागास सादर केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांना सदर परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, ७ व्या वेतन आयोगाबाबत वचनपत्र सोबत जोडलेल्या जोडपत्र - ४ मधील नमुन्यात सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ५ दिवसांच्या आत म्हणजेच दि. १७/०५/२०१९ पर्यंत कार्मिक विभागास सादर करण्यात यावा. ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी वचनपत्र (जोडपत्र - ४) कार्मिक विभागास सादर केले नाही अशा अधिकारी / कर्मचारी यांच्या ७ व्या वेतन आयोगानुसार देय थकबाकीबाबत कार्यवाही करण्यात येणार नाही.

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुखास विनंती करण्यात येते की, आपल्या विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणावे.

व्यवस्थापक (कार्मिक)

**सर्व विभाग प्रमुख**

प्रत माहितीसाठी -

१. मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक
२. मा. सहव्यवस्थापकीय संचालक (१, २ व ३) यांचे स्वीय सहाय्यक
३. मा. मुख्य दक्षता अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
४. मुख्य प्रशासक (नवीन शहरे) यांचे स्वीय सहाय्यक
५. नोटीस बोर्ड

(शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर वेपूर २०१९/प्र.क्र. १/सेवा-९
दिनांक ३० जानेवारी २०१९ चे सहपत्र)

जोडपत्र - चार

[पहा नियम ६ (२) (३)]

वचन पत्र

मी, ........................................................................ असे वचन देतो की, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील तरतूदींशी विसंगत वेतननिश्चितीच्या परिणामी किंवा पुढे वेतननिश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास ते भविष्यात मला प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून समायोजीत करून किंवा इतर प्रकारे शासनास परत करीन.

ठिकाण :

दिनांक :

सही

नाव ......................................

पदनाम.................................